# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.विधी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक-१

## सभावृत्तांत

दिनांक - ०६.०७.२००९ वेळ- सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पहिली सभा (विशेष सभा) सोमवार दिनांक ०६.०७.२००९ रोजी सकाळी ११.०० वा. महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस मा.आर.के.गायकवाड- अप्पर जिल्हाधिकारी, पुणे व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा. एकनाथ मोटे
२. मा. बाळासाहेब ऊर्फ खंडूशेठ दगडू कोकणे
३. मा. खोमणे लता हनुमंत
४. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

याशिवाय मा.सुभाष डुंबरे- अति.आयुक्त, मा.गायकवाड- सहा.आयुक्त, मा.काळे- नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.अप्पर जिल्हाधिकारी- (पिठासीन प्राधिकारी)** मी आर.के.गायकवाड अप्पर जिल्हाधिकारी पुणे याठिकाणी सर्वांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत विधी समितीच्या सभापतींची नेमणुक करणेचा विषय आहे त्यासाठी मा.विभागीय आयुक्त पुणे यांनी सभेचा पिठासीन प्राधिकारी म्हणुन माझी याठिकाणी नेमणुक केलेली आहे. मुक्त व निर्भयपणे मा.विधी समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवण्यात आलेली आहे.

**मा.नगरसचिव-** विषय क्रमांक १ - मा.विधी समितीच्या सभापतींची नेमणुक करणे. मा.विधी समितीचे सभापती पदावर नेमणुक करणेकामी एकच नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार, त्याचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १) | बाळासाहेब ऊर्फ खंडूशेठ दगडू कोकणे | बारणे सिध्देश्वर बाळासाहेब | एकनाथ मोटे |

[ मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त एक नामनिर्देशनपत्र मा.पिठासीन प्राधिकारी यांच्याकडे सुपूर्द केले. मा. पिठासीन प्राधिकारी यांनी त्याची छाननी केली. ]

**मा.अप्पर जिल्हाधिकारी- (पिठासीन प्राधिकारी)** मा.विधी समितीचे सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या उपरोक्त एका नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असुन ते नामनिर्देशन पत्र वैध ठरलेले आहे. सभापती, विधी समिती पदाकरिता वैधपणे नामनिर्देशित केलेल्या उमेदवाराचे नाव पुढीलप्रमाणे आहे.

१) बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक - १
दिनांक-०६.०७.२००९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समिती सभापती पदासाठी एकच नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले असुन वैध ठरलेले असल्याने मा.विधी समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा.बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे हे एकच रितसर नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे** यांची पिंपरी चिंचवड महा-नगरपालिकेच्या विधी समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

सही/-
**( आर.के.गायकवाड )**
अप्पर जिल्हाधिकारी- पुणे
अध्यक्ष
विधी समिती (विशेषसभा)

---------

(नवनिर्वाचित सभापती मा. बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

**मा.नगरसचिव** - विषय क्रमांक २ मा.विधी समितीच्या उपसभापतींची नेमणुक करणे.
मा.विधी समितीचे उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले नाही.

ठराव क्रमांक -२ विषय क्रमांक - २

दिनांक- ०६/०७/२००९

सूचक- मा.एकनाथ मोटे अनुमोदक- मा.अख्तरहुसेन चौधरी

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीच्या, उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले नसल्याने मा.विधी समितीच्या उपसभापतीची नेमणुक मा.सभापती निश्चित करतील त्या विशेष सभेत करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- ३ विषय क्रमांक :- ३

दिनांक :- ०६.०७.२००९

सूचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :-मा. अख्तरहुसेन चौधरी

मा.विधी समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या शुक्रवारी दुपारी २.०० वाजता विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापि सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्ट्या असलेस त्या सुट्टी/सुट्ट्यानंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी २.०० वाजता सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्यावेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/१९६/०९
दिनांक- ०६/०७/२००९ चे लगत

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

दिनांक :    /    /२००८

**<u>टिपणी :-</u>**

**<u>विषय :- मा.विधी समिती उपसभापती नेमणूकीबाबत...</u>**

मा.स.सादर,

२/- नगरसचिव कार्यालयाकडील परिपत्र क्रमांक नस/कावि/ /०८ दि.  /  /२००८ अन्वये मा.विधी समिती सभापती / उपसभापती नेमणूकीबाबत परिपत्र काढणेत आलेले होते.

सदरचे परिपत्रकान्वये फक्त मा.सभापती, विधी समिती पदाकरिता नामनिर्देशन पत्र दाखल होवून मा.सभापती यांची सदर कमिटीवर नेमणूक करणेत आलेली आहे.

सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीच्या उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखले झाले नसल्याने मा.विधी समितीच्या उपसभापतींची नेमणूक करणेकामी मा.सभापती निश्चित करतील त्या विशेष सभेची तारीख व वेळ मिळणेस विनंती आहे.

**वरिष्ठ लिपीक**

**उपनगरसचिव**

**नगरसचिव**

मा.विधी समिती सभा दि.०७/०६/२००८ ठ.क्र.२ अवलोकनास्तव व मा.विधी समितीच्या उपसभापतीची नेमणुक करणेकामी आयोजित करावयाच्या विशेष सभेची तारीख व वेळ निश्चित करुन मिळणेस्तव विनंतीपुर्वक सादर...

**मा.सभापती**

विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका